# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/02/2023 (बुधवार) दुपार

---

## दुखापत

**१) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत वार्ड क्रं. ०२ ओमनगर चनकापुर ता. सावनेर येथे दिनांक २०/०२/२०२३ चे २१.२० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे— सौ. सरीता नंदलाल तिवारी, वय ५० वर्ष, रा. वार्ड क्रं ०२ ओमनगर चनकापुर ता. सावनेर ही तीचे राहते घरी झोपुन असतांना यातील नमुद आरोपी नामे— सुरज गौरी रामदास, वय २४ वर्ष, रा. क्वाटर नं १०३/१ चनकापुर ता. सावनेर याने फिर्यादीचे राहते घरात प्रवेश करून फिर्यादी झोपुन असतांना कोणतेही कारण नसतांना फिर्यादी यास ब्लेडने चेहऱ्यावर व दोन्ही हाताच्या दंडावर वार करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५२, ३२४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अमोल लोहकरे ब. नं. १६७३, मो क्रं. ८६६८८३३४७७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत मंगळवारी वार्ड रामटेक येथे २१/०२/२०२३ चे २१.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— योगेश वंसता बोरीवार, वय ३९ वर्ष, रा. मंगळवारी वार्ड रामटेक व आरोपी नामे— अजय रामेलवार रा. मंगळवारी वार्ड रामटेक हे नात्याने भाउजी व साळा असुन एकमेकांच्या आजुबाजुला राहतात. नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्याचे पत्नीसह घरी आराम करीत असता फिर्यादीच्या दारात कोणीतरी आले होते. ते पाहण्याकरीता फिर्यादी हे आपल्या घराबाहेर गेले असता फिर्यादीचा साळा हा अंगणात उभा होता. व तो फिर्यादीला पाहुन बडबड करू लागला. यावरून फिर्यादीने आरोपीस हटकले असता यातील आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करून कोणत्यातरी वस्तुने डाव्या हाताच्या मनगटावर मारून दुखापत केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक योगेश भुरे ब. नं. ६७३ मो. नं. ७७२२००३६७३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर